# कौ.हिं.म.सं.अर्ज क्र.१४/२०२४ निशाणी क्र.०५ वरील आदेश

१. सदरचा अर्ज अर्जदार क्र. १ व २ यांनी गैरअर्जदारांकडून अंतरीम अन्नवस्त्राची पोटगीची प्रत्येकी दरमहा रक्कम रूपये १०,०००/– व योग्य ते न्यायाचे हुकूम अर्जदाराचे लाभात मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराने मुळ अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ नुसार गैरअर्जदारांविरूध्द कलम १८, १९, १९(८), २०, २०(३) व २२ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदारांचे मुळ अर्जामधील कथनानुसार अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी आहे. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दि.२३/०४/२०१९ रोजी अंतरवेली, ता. येवला, जि. नाशिक येथे जातीरिवाज व रूढी परंपरेनुसार झाले. सदर विवाह संबंध अद्याप कायम असुन सदर विवाहबंधनातुन अर्जदार क्र. २ नामे उर्वी ही झालेली आहे. गैरअर्जदार क्र.२ ते ५ हे गैरअर्जदार क्र. १ चे नातेवाईक आहेत. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र.१ यांचे लग्नसंबंध आजही अस्तित्वात आहे. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारचा कौटूंबिक छळ करत होता. गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी सुरुवातीचे ३–४ महिने बरे नांदविले. परंतु त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ ते ५ यांनी अर्जदार क्र. १ चा शारीरीक, मानसिक व वैवाहिक छळ केला व लग्नाच्या कारणावरुन छळ केला. तसेच घर बांधकामासाठी माहेरहुन दहा लाख रुपये घेवून ये या कारणामुळे तिला त्रास दिल्याचे तिने नमुद केले आहे. त्यानंतर अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ पासुन गर्भवती झाली व गरोदरपणाच्या काळातही गैरअर्जदारांनी तिचा छळ केला. त्यानंतर अर्जदार क्र. २ नामे उर्वी हिचा जन्म झाला. परंतु गैरअर्जदारांनी बेकायदेशीर पैशांची मागणी, छळ तसेच बेकायदेशीरित्या फारकतीची मागणी करत होते. त्यानंतर अर्जदार क्र. १ ही दुस–यांदा गरोदर राहिली परंतु पुन्हा मुलगी जन्माला येईल म्हणुन गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ वर गर्भपातासाठी दबाव आणला. तेव्हा अर्जदार क्र. १ हिने नकार दिल्याने गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. २ हिस जिवे मारण्याची धमकी दिल्याने अर्जदार क्र. १ ची इच्छा नसतांना गर्भपात करुन अर्जदार क्र. १ हिस माहेरी सोडुन दिले व अर्जदार क्र. २ हिस हिसकावुन घेतले व अर्जदार क्र. २ हिस नांदायला येण्यास नकार दिला व नांदायला आली तर अर्जदार क्र. १ व २ यांना जीवे मारुन टाकु अशी धमकी दिली. त्यामुळे नाईलाजाने अर्जदार क्र. १ हिने तिचे वडीलांसोबत रितसर तक्रार एन. सी. क्र. ९९६/२०२१ नोंदवली व पोलीसांनी गैरअर्जदार क्र. १ ते

५ यांना अर्जदार क्र. २ सोबत पोलीस स्टेशनला बोलावले व अर्जदार क्र. २ हिस अर्जदार क्र. १ हिच्या ताब्यात दिले. त्यानंतर गैरअर्जदारांनी सांगितले की, अर्जदार क्र. १ हिस आठ दिवसात नांदायला घेवुन जाण्याचे आश्वासन दिले. परंतु अर्जदाराला गैरअर्जदारांनी नांदविण्यास नेले नाही. जुलै २०२१ चे पहिल्या आठवडयापासुन ते आजपावेतो अर्जदार ही माहेरी राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार क्र. १ केलेल्या मारहाणीमुळे व शारीरीक व मानसिक छळामुळे अर्जदार हिस कामधंदा होत नाही.

३. याउलट गैरअर्जदार क्र. १ व त्याचे कुटुंबिय मौजे कानडी, ता. येवला, जि. नाशिक येथे ७ ते ७ एकर बागायती शेतजमीन असुन त्यातुन वर्षाला ९ ते १० लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा नोकरीस आहे व त्यापासुन त्याला दरमहा २० हजार रुपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदार क्र. २ ते ५ हे देखील कमविते असुन ते स्वत:ची उपजीवीका भागविण्यास समर्थ आहेत. गैरअर्जदार क्र. १ वर अर्जदारांव्यतिरिक्त कोणीही अवलंबुन नाही. तसेच गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ व २ यांचा स्वत:हुन त्याग केला आहे. सदर अर्जाच्या निर्णयाला वेळ लागणार असल्यामुळे अन्नवस्त्राची अंतरिम पोटगी म्हणुन अर्जदारांनी वरीलप्रमाणे पोटगीची मागणी केली.

४. गैरअर्जदारांना सदर अर्जाचे समन्स लागल्यानंतर ते त्यांच्या वकिलांमार्फत हजर झालेत. गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी मुळ अर्जाला व अंतरिम पोटगीच्या अर्जदाराच्या अर्जाला जबाब निशाणी क्र. १३ अन्वये दिला. त्यांच्या लेखी म्हणण्यानुसार अर्जदारांचे सर्व कथन फेटाळून लावले. त्यांनी अर्जदार त्याची विवाहाची पत्नी आहे व त्यांचा विवाह संबंध अस्तित्वात असल्याचे मान्य केले. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ हे दोघे घटस्फोटीत असुन त्यांचा हा दुसरा विवाह आहे. अर्जदारांचे अर्जातील अन्य सर्व कथने नाकारले आहेत. त्यांच्या मुळ अर्जातील खुलाश्याला अर्जदाराच्या बाबतीत कथने केली की, अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ बरोबर नांदण्यास तयार नाही. त्यामुळे तिने गैरअर्जदार क्र. १ व त्याचे कुटूंबियांविरुध्द खोटे आरोप केले आहे. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ व त्याचे कुटुंबियांसोबत सुरुवातीचे काही दिवस बरी नांदली. त्यानंतर अर्जदार क्र. १ ही घरातील कामे वेळेवर करीत नसे व सतत मोबाईलवर कोणाशीतरी बोलत असे. त्याबाबत गैरअर्जदार क्र. १ ने विचारणा केली असता अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ च्या अंगावर धावुन येत, आत्महत्या करण्याची धमकी देत. अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ यांचे हे दुसरे लग्न असलयाने काही विचारणा करत नसे व त्याचा गैरफायदा घेवुन अर्जदार क्र. १ सतत तिचे माहेरी निघुन जात व गैरअर्जदार क्र. १ प्रत्येकवेळी अर्जदार क्र. १ हिस विनंती करुन नांदायला घेवुन

येत असे. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ व त्याचे कुटुंबियांना शारीरीक व मानसिक त्रास देत व अर्जदार क्र. १ हिचा स्वभाव अत्यंत रागीट व त—हेवाईक होता व ती गैरअर्जदार व त्याचे कुटूंबियांना टाकुन बोलत असे. अर्जदार क्र. १ हीचे माहेर जवळ असलयाने ती तिचे भावांना बोलावुन घेत असत व गैरअर्जदार क्र. १ एकटा असतांना त्यास वाईटसाईट शिवीगाळ करत व त्यास हातपाय तोडुन टाकण्याची धमकी देत व अर्जदार क्र. १ हिस राग आल्यानंतर हातात मिळेल ती वस्तु गैरअर्जदार क्र. १ यास फेकुन मारत. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ याच्या चारित्र्यावरही संशय घेत. त्यानंतर अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. यांना अर्जदार क्र. २ उर्वी जन्माला आली. परंतु मुलगी जन्माला आलयाने अर्जदार क्र. १ ही नाराज होती व त्याचा सर्व दोष तीने सामनेवाला क्र. १ यास देवु लागली. अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ हिचाही व्यवस्थित संभाळ करत नसत.

५. परंतु, दि. १२/०७/२०२१ रोजी अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ अगर त्याचे कुटूंबियांना न सांगता माहेरी निघुन गेली व त्यानंतर प्रयत्न करुनही सामनेवाला क्र. १ कडे अर्जदार क्र. १ हीने नांदण्यास येण्यास नकार दिला. दि. २५/१०/२०२१ रोजी गैरअर्जदार क्र. १ स्वत: अर्जदार क्र. १ हिस नांदण्यास घेण्यासाठी गेला असता अर्जदार क्र. १ हिने येवला येथे घर घेवुन राहणार असेल तरच नांदण्यास तयार असल्याचे सांगितले. परंतु गैरअर्जदार क्र. १ याने त्या बाबीस नकार दिल्याने अर्जदार क्र. १ ने नांदण्यास येण्यास नकार दिला. त्यानंतर पुन्हा २०२४ मध्ये गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. १ हिस माहेरी घेण्यासाठी गेला. त्यावेळी अर्जदार क्र. १ हिने जमीन तिचे नावे करणार असाल तर नांदायला येईल असा हट्ट धरला व त्याबाबत गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. २ हिच्या नावे जमीन करतो अशी तयारीही दाखवली परंतु अर्जदार क्र. १ हिने तिच्याच नावावन जमीन करावी असा हट्ट धरला व ते गैरअर्जदारास अशक्य होते. अर्जदार क्र. १ हिने प्रत्येकवेळी काहीतरी कारण सांगुन नांदण्यास येण्यास नकार दिला शिवाय सामनेवालांविरुध्द खोटया तक्रारी केल्या. अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदाराचा स्वत:हुन त्याग केला आहे व पोटगी मिळण्यास अर्जदार क्र. १ पात्र नाही असे कथन केले.

६. अर्जदार क्र. १ ही एसएनडी या संस्थेत नोकरी करत असुन तिला दरमहा १५ ते २० हजार रुपये उत्पन्न मिळते व ती स्वत:ची उपजिवीचा भागविण्यास समर्थ आहे. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा नोकरीस नाही व त्याची कोणत्याही प्रकारची रक्कम देण्याची ऐपत नाही. त्याचप्रमाणे तो अर्जदाराला पोटगी देण्यास असमर्थ असल्याचे सांगितले.

७. उभय पक्षांचे कथनावरून खालील वादबिंदू मी माझ्या विचारासाठी घेतले आहेत व त्यावरील निष्कर्ष त्याखालील दिलेल्या कारणांकरीता मांडत आहे.

| | **वादबिंदु** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम अर्थसहाय्य मिळण्यास पात्र आहेत काय? | ... होय... |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशानुसार. |

**कारणमिमांसा**

८. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

९. कलम २३ कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अंतर्गत प्रकरण प्रलंबित असताना अंतरिम पोटगीची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सदर पोटगीची व्यवस्था ही हिंसाचारग्रस्त महिलेची कमाईच्या साधनाअभावी उपासमार होवू नये त्याचप्रमाणे तिला आवश्यक ते आर्थिक सहाय्य मिळावे जेणेकरून ती कमीतकमी प्रकरणाची कायदेशीर लढाई तरी लढू शकेल, या उदात्त हेतूने सदर तरतुद करण्यात आलेली आहे.

१०. प्रकरणाचे संपुर्ण अवलोकन केले असता अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह झालेला असून तो आजही अस्तित्वात आहे याबाबत काही वाद उपस्थित झालेला नाही. लग्नसंबंधातुन अर्जदार क्र. २ ही मुलगी झाली आहे हीही बाब मान्य व कबुल आहे. अर्जदाराने तिच्या अर्जात गैरअर्जदारांनी कशाप्रकारे कौंटुंबिक हिंसाचार केला याबाबत सविस्तर कथन केले आहे, गैरअर्जदार क्र. १ घरातील कोणताही कामधंदा येत नाही असे म्हणून त्रास देत. तसेच घर बांधकामासाठी तु तुझ्या माहेरहून दहा लाख रुपये घेवून ये असे म्हणून शारिरीक व मानसिक त्रास दयायचा. अर्जदार क्र. १ च्या इच्छेविरुध्द गर्भपात केल्याचे व अर्जदार क्र. १ हिस जीवे मारण्याची धमकी दिल्याचे नमुद केले आहे. दोघांनीही एकमेकाच्या विरुध्द आरोप प्रतिआरोप केलेले ओहत. अर्जदाराच्या कथनानुसार तिला पैशाची मागणी करुन शारीरीक मानसिक छळ करुन, तिच्या मुलीला हिसकावुन घेवुन तिचा गर्भपात करुन कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे. याउलट गैरअर्जदाराच्या म्हणण्यासनुसार अर्जदाराचची वागणुक संशयास्पद आहे. ती नेहमी कोणलातरी फोनवरुन बोलत असे. घरात कामधंदा करत नव्हती. नेहमी

न सांगाताच माहेरी निघुन जात होती. अर्जदाराला गैरअर्जदाराकडे नांदण्याची इच्छा नाही म्हणुन अर्जदाराने सामनेवालाचा स्वत:हुन त्याग करुन मुलीसह तिच्या माहेरी निघुन गेलेली आहे. प्रयत्न करुनही ती परत नांदायला आली नाही. स्वाभाविक दोघा पक्षकारांना पुराव्याची संधी दिल्याशिवाय त्यावर सखोल भाष्य करणे अधिक योग्य ठरणार नाही. परंतु वास्तविक अर्जदाराला तिच्या माहेरी राहावे लागत आहे व त्यांना सासरी नेण्याबाबत कुठलेही विशेष प्रयत्न गैरअर्जदाराने केल्याचे दिसुन येत नाही. त्याचप्रमाणे गैरअर्जदाराविरुध्द गुन्हा क्र. १५/२०२४ कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ अन्वये अर्जदाराच्या फिर्यादवरुन दाखल झालेला आहे. त्याचप्रमाणे दि. १८/०७/२०२१ रोजी कलम ३२३, ५०४, ५०६ भा.द.वी प्रमाणे अदखलपात्र गुन्हयाची नोंद क्र. ९९६/२०२१ ही दाखल केलेली आहे. हयावरुन हे प्रथमदर्शनी स्पष्ट होते की, अर्जदाराला त्रास झालेला आहे व त्यामुळेच ती माहेरी राहत आहे. परिणामी, कौटुंबिक हिंसाचार होत असल्याचा निष्कर्ष प्रथमदर्शनी काढता येवू शकतो.

११. अशा परिस्थितीमध्ये अर्जदाराकडे काही आर्थिक कमाईचे साधन आहे किंवा नाही व नसल्यास गैरअर्जदार क्र.१ ची त्यांचा उदरनिर्वाह करण्याची ऐपत आहे किंवा नाही हे बघणे महत्वाचे ठरते. येथे या गोष्टीचा उल्लेख करावा लागतो की गैरअर्जदाराची अर्जदाराचा उदरनिर्वाह करण्याची नैतिक व वैधानिक जबाबदारी आहे. त्यामुळे त्याच्या ऐपतीचा मुद्दा फक्त पोटगीची अंतरिम रक्कम ठरविण्या इतकाच आवश्यक ठरतो.

१२. अर्जदाराने असे कथन केले आहे की, गैरअर्जदारांची अर्थिक परिस्थिती चांगली असून गैरअर्जदार क्र.१ हा नोकरी करत असून त्याला दरमहा २०,०००/– इतका पगार मिळतो. त्याच्यावर अर्जदारांव्यतिरिक्त कोणाचीही जबाबदारी नाही. गैरअर्जदारांची ७ ते ८ एकर बागायती जमीन असुन त्यापासुन त्यांना ९ ते १० लाख उत्पन्न मिळते. शिवाय त्याचे कुटूंबीय देखील कमविते आहे.

१३. याउलट गैरअर्जदारांनी असे सांगितले आहे की, गैरअर्जदार क्र. १ नोकरीस नाही. तथापि, अर्जदार क्र. १ ही नोकरी करते व तिला स्वत:चे उत्पन्न आहे. सदर प्रकरणात अर्जदार क्र. १ यांनी नि. क्र. १९ अन्वये आपले दायित्वाचे शपथपत्र दाखल केले आहे. शपथपत्राचे अवलोकन केले असता अर्जदार क्र. १ ही तिचा चरितार्थ भागविण्यास समर्थ नाही व तिचेवर अर्जदार क्र. २ अवलंबुन आहे असे दिसते. गैरअर्जदारानेही त्याचे उत्पन्न व दायित्वाचे शपथपत्र नि. क्र.२४ वर दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जदाराला नोकरी असल्याचे व तिचे निश्चीत उत्पन्न नमुद केलेले नाही.

तसेच त्याला जंगम किंवा स्थावर मिळकत असल्याचे नमुद नाही.

१४. अर्जदार व गैरअर्जदार हे दोघेही एकमेकांच्याविरुध्द शपथपत्रामध्ये नोकरी असल्याबाबत सांगत आहे. परंतु दोघांनीही दोघांच्या नोकरी बाबतीत कागदोपत्री पुरवा अभिलेखावर अणलेल नाही. अर्जदाराच्या शपथपत्रातील मजकुरानुसार गैरअर्जदाराला १० लाख रुपये प्रतिवर्ष उत्पन्न मिळते. परंतु, हे दर्शविण्यासाठीही अर्जदाराने कोणताही कागदोपत्री पुरावा आणलेला नाही. या घडीला दोनही बाजुंकडुन एकमेकांचे उत्पन्न दर्शविण्यासाठी कोणताही कागदोपत्राी पुरावा दाखल केलेला नाही. दोघेही फकत तोंडीच बोलत आहेत. अशा परिस्थितीत दोन्ही पक्षकारांचे उत्पन्न आणि त्यांची निकड निर्धारित करणे कठीण आहे.

१५. परंतु, अर्जदार क्र. १ ही महिला आहे आणि अर्जदार क्र. २ ही मुलगी आहे. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे आज तिला वडिलांकडे माहेरी राहणे भाग पडत आहे. गैरअर्जदार क्र.१ हा कामधंदा करतो किंवा नाही, तो नेमका काय करतो हे दर्शविलेले नसले तरीदेखील त्यामुळे त्याची अर्जदारास सांभाळण्याची जबाबदारी नाकारता येत नाही. गैरअर्जदार हा पती असल्यामुळे अर्जदार ही पत्नी आणि मुलगी असल्यामुळे त्यांचा सांभाळ, पालनपोषण करण्याची कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी गैरअर्जदाराची आहे. गैअर्जदारांने अर्जदार वेगळी राहत असल्यापसुन त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय केलेली नाही, किंवा दुस–या एखाद्या प्रकरणात अर्जदउराला पोटगी मंजुर झालेली आहे असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. म्हणुन, प्रस्तुत प्रकरणाच्या परिस्थितीला अनुसरून अर्जदार हे अंतरिम अर्थसहाय्य म्हणुन खालील पोटगी मिळण्यास पात्र आहेत.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो.

२.गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ व २ यांना एकत्रित दरमहा रक्कम रूपये ३,०००/– (रक्कम रूपये तीन हजार मात्र) आर्थिक सहाय्य म्हणून अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून दयावेत.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

PATHAN JAHANGIR RASHEED
Digitally signed by PATHAN JAHANGIR RASHEED
Date: 2025.10.29 11:39:57 +0530

दिनांक: २८.१०.२०२५

(जहांगीर आर. पठाण)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, येवला.